# श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

## विषय : गृहअर्थशास्त्र

## अभ्यासमंडळाअंतर्गत घेण्यात आलेले विविध उपक्रम

## सत्र -२०२३-२४

अभ्यासमंडळाचे सर्व उद्दीष्ट्ये साध्य व्हावे म्हणुन सत्र २०२३-२४ याशैक्षणिक सत्रात पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

- गृहअर्थशास्त्र अभ्यासमंडळाचे उद्‌घाटन आणि पोषण सप्ताह अंतर्गत डिश डेकोरेशन स्पर्धा (दि.४ सप्टेंबर २०२३
- पोषण सप्ताह निमीत्त पोषण सुंदरी स्पर्धा (दि.६ सप्टेंबर २०२३)
- B.A.III च्या विद्यार्थीनींची अंगणवाडीला 'शैक्षणिक भेट ' (२३ आक्टोंबर २०२३)
- आधुनिक भारतातील स्त्री चळवळ कार्यशाळा (३ जानेवारी २०२४)
- B.A. II च्या विद्यार्थीनींची प्रात्यक्षीका अंतर्गत भेट (७ एप्रील २०२४)
- Event Management अंतर्गत वाढदीवसाच्या पार्टीचे आयोजन (२८ मार्च २०२४)
- B.A semIV च्या विद्यार्थीनींची प्रात्याक्षीकाअंतर्गत भेट (२ एप्रील २०२४)
- ब्लॉक प्रिंटींग (ठसा छपाई) च्या प्रात्यक्षीकाचे आयोजन (४ एप्रील ते ६ एप्रील २०२४)

**अभ्यासमंडळाची कार्यकारिणी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. दिक्षा कातलाम | बी.ए.भाग -३ | अध्यक्ष |
| २. | कु. समीक्षा कुंजेकार | बी.ए.भाग-३ | उपाध्यक्ष |
| ३. | कु. टिना सराटे | बी.ए.भाग-३ | सचिव |
| ४. | कु. कशिश करसे | बी.ए.भाग-२ | सदस्य |
| ५. | कु . योगीता तीवाडे | बी.ए.भाग-२ | सदस्य |
| ६. | कु. आरती गवारले | बी.ए.भाग-२ | सदस्य |
| ७. | कु. प्रियंका समरीत | बी.ए.भाग-१ | सदस्य |
| ८. | कु. प्रतीक्षा ऊपासे | बी.ए.भाग-१ | सदस्य |
| ९. | कु. गौरी मोहुरले | बी.ए.भाग-१ | सदस्य |

## १. गृहर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन आणि डीश डेकोरेशन स्पर्धा (४ सप्टेंबर २०२३)

गृह अर्थशास्त्र विभागांमध्ये पोषण सप्ताह साजरा करण्यात आला. १ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर या सप्ताहा मध्ये या विभागाद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये सर्वप्रथम ४ सप्टेंबरला गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत सर यांनी केले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कार्यक्रमाला उपस्थित होते .

त्यानंतर डिश डेकोरेशन स्पर्धा ठेवण्यात आली होती यामध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थिनी सहभाग नोंदविला होता स्पर्धेचे परीक्षण महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉक्टर नीता केने व मराठी विषयाचे प्राध्यापक सुवर्णा घोपे यांनी केले। यावेळी स्पर्धेमध्ये परीक्षकांनी निवडलेल्या विद्यार्थिनींना विभागातर्फे बक्षीस सुद्धा देण्यात आले या स्पर्धेला विद्यार्थिनींनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी निकिता वंजारी हिने केले तर आभार प्रदर्शन कुमारी टीना सराटे हिने केले कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते तसेच बहुसंख्या विद्यार्थिनींची उपस्थिती होती.








**उद्‌घाटन समारंभ आणि डीश डेकोरेशन स्पर्धा**

## २.पोषण सप्ताह निमित्त पोषण सुदरी स्पर्धा ( 6 सप्टेंबर 2023)

जागतिक पोषण सप्ताह निमित्त महाविद्यालयांमध्ये 6 सप्टेंबर 2023 ला पोषण सुंदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये सुद्धा बऱ्याच विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता या स्पर्धेचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर मोनाली इंगळे यांनी केले स्पर्धेमध्ये परीक्षकांनी निवडलेल्या विद्यार्थिनींना विभागातर्फे बक्षीस देण्यात आले होते स्पर्धेचे परीक्षण महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉक्टर नीता केने यांनी केले महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनीं या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.







**पोषण सुदरी स्पर्धा**



**४.आधुनिक समाजातील स्त्री चळवळ कार्यशाळा (3 जानेवारी 2024)**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या वतीने डॉ.आंबेडकर अध्यासन केंद्र यांच्यामार्फत ही कार्यशाळा होती या कार्यशाळेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व गृह अर्थशास्त्र विभागाने केले होते कार्यशाळेमध्ये आधुनिक काळातील स्त्री चळवळ यावर डॉक्टर कुसुमेंद्र सोनटक्के यांचे व्याख्यान आयोजित केले होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मोनाली इंगळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षते स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राऊत सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेविकास सरोज आवारे मॅडम होत्या. प्रमुख वक्ते आणि पाहुण्यांनी आधुनिक काळातील स्त्रीवर आपले विचार व्यक्त केले व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.












**३.दत्तापूर धामणगाव येथील अंगणवाडी ला भेट (23 ऑक्टोबर 2023)**

दिनांक 23 ऑक्टोबर 2023 ला गृह अर्थशास्त्र विभागातर्फे दत्तापूर धामणगाव येथील अंगणवाडीला भेट देण्यात आली विद्यार्थिनींनी अंगणवाडीला भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच तेथील मुलांनी विविध गोष्टी बडबड गीते सांगून त्यांचे मनोरंजन केले. मुलांना खेळण्यासाठी कोणती खेळणी आहेत हे पाहिले तेथील, शिक्षकांनी खेळण्यासोबत मुलांना शिकविण्याचे धडे दिले जाते असे त्यांनी सांगितले॰ यामध्ये बी.ए॰सेमि- V च्या विद्यार्थिनींचा समावेश होता.




**दत्तापूर धामणगाव येथील अंगणवाडी**






### ५.इंटेरियर डिझाईन होम ला शैक्षणिक भेट (7 मार्च 2024 )


दिनांक 7 मार्च 2024ला बीए भाग- I सेमिस्टर II गृह अर्थशास्त्र विभागाच्या मुलींची शैक्षणिक भेट धामणगाव रेल्वे येथे रहिवासी श्री शापिक शाहा, राठी नगर यांच्या घराला भेट देण्यात आली. ते एक व्यावसायिक आहे. खूप सुंदर घर पाहायला मिळाले सर्व सुविधा त्या घरात आढळून आल्या. आधुनिक काळातील किचन मुलींना पाहायला मिळाले. किचनमध्ये सर्व सुविधा उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील मुलींना अशी किचन टीव्ही आणि सिनेमा मध्येच पाहतात त्यांना ते पाहून बरीच माहिती झाली. घरातील खोल्यांची रंगयोजना, पडदे, सोफा, होम हीटर सुद्धा तिथे होते मुलींसाठी स्टडी रूम वेगवेगळ्या प्रकारचे लाईट्स फॅन शावर हे विद्यार्थिनींसाठी फार वेगळे होते. आणि त्यांनी त्या सगळ्या गोष्टी फार काळजीपूर्वक बघितल्या व जे समजले नाही त्यांचे घरमालकाकडून माहिती पण घेतली.

एकंदरीत या व्हिजिटचा फायदा मुलींच्या ज्ञानात भर पाडून गेला आजच्या काळामध्ये प्रत्येक मुलीला नवीन साधनांबद्दल माहिती असणे गरजेचे आहे उद्या लग्न होऊन जर श्रीमंत घरामध्ये गेल्या तर त्यांना प्रत्येक वस्तू ही अनोळखी वाटू नये आणि त्यांच्या वापर कसा करायचा याचे ज्ञान आजच्या विद्यार्थिनीला असायला हवे म्हणून ही शैक्षणिक भेट ही विद्यार्थिनींसाठी एक चांगला आणि सुखद अनुभव देऊन गेली.









### ६.इव्हेंट मॅनेजमेंट अंतर्गत वाढदिवसाच्या पार्टीचे आयोजन(28 मार्च 2024)

विद्यार्थिनींना कार्यक्रमाचे व्यवस्थापन करता यावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बीए भाग-III च्या विद्यार्थिनींनी वाढदिवसाच्या पार्टीचे आयोजन कसे करायचे याचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी कल्पनाताई चव्हाण यांचा वाढदिवस 28 मार्चला साजरा करण्यात आला. आणि त्यांनी हा कार्यक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने आयोजित केला. पहिले कार्यक्रमाची पत्रिका ठरविली आणि मग महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या पार्टीसाठी आमंत्रित केले कल्पनाताई चव्हाण ह्या 30 मार्चला सेवानिवृत्त झाल्या त्यामुळे विद्यार्थिनींनी त्यांचा वाढदिवस हा खूप छान केला येणाऱ्यांचे स्वागत त्यांनी गुलाबाचे फुल देऊन केले सर्व विद्यार्थिनी मिळून केक आणला सुरुवातीला त्यांचे औक्षण केले. नंतर केक कापला सर्वांना नाश्ता दिला. त्यांची ही वाढदिवसाची व्यवस्था पाहून सर्वांनी त्यांचे कौतुक केले. आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.













## ७.जयश्री गृह उद्योग आणि मधुसूदन दूध डेअरी अमरावती येथे शैक्षणिक भेट

## (2 एप्रिल 2024)

2 एप्रिल 2024 ला कृष्णार्पण कॉलनी अमरावती येथील जयश्री गृह उद्योगाला भेट देण्यात आली. या गृह उद्योगाच्या मालकीण सौ जयश्री घुंबरे यांनी या उद्योगाला 13 वर्षा आधी सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत केली वेगवेगळे ट्रेनिंग केले बाहेरील ट्रेनिंग केले. आणि नंतर त्यांना यामध्ये यश मिळायला सुरुवात झाली आणि नंतर त्यांनी एक यशोगाथा निर्माण केली त्यांना राज्यस्तरीय 27 ते 28 पुरस्कार सुद्धा प्राप्त झाले. आज त्यांचे प्रॉडक्ट हे कुठल्याही मार्केटमध्ये सहज मिळते त्या संरक्षित  पदार्थ लोणचे, शरबते, मुरब्बा वेगवेगळ्या प्रकारची लोणचे आणि शरबते मार्केटला प्रसिद्ध आहेत. त्यांच्या प्रॉडक्ट ला त्यांनी स्वतःचेच नाव दिले आहे. विद्यार्थीनींना त्यांनी खूप चांगले मार्गदर्शन केले आणि स्वयंरोजगारातून तुम्ही आत्मनिर्भर होऊ शकता याचे मार्गदर्शन केले.

त्यानंतर अमरावती येथीलच मोती नगर येथील **मधुसूदन दूध डेअरीला** भेट दिली बीए भाग २ च्या सेमिस्टर IV च्या विद्यार्थिनी होत्या डेरीचे मालक श्री गणेश सूर्यवंशी यांनी तेथील दुधाच्या पदार्थाचे संरक्षण कसे करायचे किंवा करतात हे विद्यार्थिनींना समजून सांगितले कोणती मशीन कशाचं काम करते. याचे मार्गदर्शन केले. तसेच घरच्या घरी दुधापासून जे पदार्थ जसे दही, खवा, पनीर, श्रीखंड हे पदार्थ कसे तयार करायचे याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थिनींना खूप सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले.






**८.ब्लॉक प्रिंटिंग ठसा छपाई च्या प्रात्यक्षिकाचे आयोजन (4 एप्रिल व 6 एप्रिल 2024)**

बीए भाग- I च्या विद्यार्थिनींसाठी गृह अर्थशास्त्र विभागाद्वारे प्रात्यक्षिक आणि अंतर्गत विद्यार्थिनींना ठसा छपाई हे कापडावर कसे करायचे त्याचे प्रशिक्षण दिले साडी, ड्रेस, पिलो, चादर यावर ठसा छपाई कशी करायची हे शिकविण्यात आले. ते शिकल्यानंतर त्यांनी सरावाने चांगले ठसा छपाई करता येऊन त्या आपल्या पायावर उभे राहू शकतात याचे मार्गदर्शन केले. शिक्षणानंतर नोकरी लागेल अशी शक्यता फार कमी असल्यामुळे स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून जर याकडे पाहिले तर त्या ब्लॉक प्रिंटिंग चे बाहेरून चांगले प्रशिक्षण घेऊन स्वतःच आत्मनिर्भर बनू शकतात आणि दुसऱ्यांनाही रोजगार देऊ शकतात. यामध्ये महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता अशा प्रकारे गृह अर्थशास्त्र विभाग विद्यार्थिनींच्या विकासासाठी नेहमीच तत्पर असतो. आणि महाविद्यालयातील विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनवून अर्थार्जन करण्यासाठी हा विभाग नेहमीच सहकार्य करीत असतो.




**ठसा छपाई**




**ब्लॉक प्रिंटिंग**